SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

गुरूवार, दिनांक १४ जानेवारी, २०२१

अधिसुचना

क्र. : ०९/२०२१ दिनांक : १४/१/२०२१

विषय : सॉफ्टबॉल (पुरूष व महिला) या चमुंमध्ये खेळाडूंची संख्या १५ वरून १८ करण्याबाबत..

सर्व सामान्यांच्या माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते की, सॉफ्टबॉल (पुरूष व महिला) या चमुंमध्ये शैक्षणिक सत्र २०२१-२०२२ पासुन खेळाडूंची संख्या १५ वरून १८ करण्याकरिता व त्यानुसार स्पर्धेत खेळाडू सहभागी करून घेण्याच्यादृष्टीने क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाने दिनांक १४.०८.२०२० रोजी संपन्न झालेल्या सभेत (दिनांक ०१.०७.२०२० रोजीची तहकुब सभा) विषय क्र. ६० अन्वये शिफारस केली असता सदर शिफारसीच्या अनुषंगाने वित्त व लेखा समितीने दिनांक १०.०९.२०२० व १९.०९.२०२० च्या सभेत विषय क्र.२९ अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव शिफारस करण्यात आली. त्यानुसार व्यवस्थापन परिषदेने दिनांक २८.११.२०२० रोजी संपन्न झालेल्या सभेत विषय क्र. ७५ अन्वये शैक्षणिक सत्र २०२१-२०२२ पासुन सॉफ्टबॉल (पुरूष व महिला) या स्पर्धेच्या चमुंमध्ये खेळाडूंची संख्या १५ वरून १८ करण्यास मान्यता प्रदान केली असुन त्यानुसार अनुक्रमे –

१. आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत तसेच आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत शैक्षणिक सत्र २०२१-२०२२ पासुन सॉफ्टबॉल (पुरूष व महिला) या चमुंमध्ये खेळाडू संख्या १५ वरून १८ करण्यात येत आहे.

२. सॉफ्टबॉल (पुरूष व महिला) या चमुअंतर्गत विद्यापीठाच्या आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना विनियम क्र. ६/२०१९ चे तरतुदीनुसार खेळाडू पोषाख, कलरकोट, मोनो, खेळ साहित्य तसेच वेळोवेळी सुधारितरित्या निर्गमित करण्यात आलेल्या अधिसूचनेनुसार प्रशिक्षण कालावधीत प्रती दिवस प्रती खेळाडू अल्पोपहार भत्ता (Refreshment Allowance) प्रदान करण्यात येईल.

३. सॉफ्टबॉल (पुरूष व महिला) क्रीडा स्पर्धेचे आयोजनाकरिता विद्यापीठाच्या विनियम क्र. ६/२०१९ मधील तरतुदीनुसार तसेच **विद्यापीठ राजपत्र भाग-२** अन्वये दिनांक ०९ एप्रिल, २००९ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या **अधिसूचना क्र. ५०/२००९ दिनांक ०३.४.२००९ च्या परिशिष्ट अ व ब** मध्ये नमुद केलेले वाढीव दर तसेच वेळोवेळी अधिसूचित करण्यात येणारे वाढीव दर अनुज्ञेय राहील.

४. सॉफ्टबॉल (पुरूष व महिला) क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंचे प्रवेश शुल्क हे विद्यापीठ राजपत्र भाग-२ मधील पृष्ठ क्र. ३९ वर प्रकाशित करण्यात आलेल्या अधिसूचना क्र. २४/२०१२ दिनांक २३.२.२०१२ मध्ये निर्धारित करण्यात आलेल्या शुल्कासह प्रवेश अर्ज विहित कालावधीत सर्वसंबंधीत महाविद्यालयांनी विद्यापीठात धनादेश, धनाकर्ष अथवा रोखीने जमा करणे अनिवार्य राहील.

स्वा/-
(डॉ. तुषार आर. देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ